| | | |
|---|---|---|
| MHGO040015262024 | DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>सत्यमेव जयते | दाखल दिनांक ०४.१२.२०२४.<br>नोंदणी दिनांक ०४.१२.२०२४.<br>**निकाल दिनांक ११.०३.२०२६**<br>कालावधीः वर्ष महिने दिवस<br>०१ ०३ ०७ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांचे न्यायालयात, आमगांव.**
**(पिठासीन अधिकारी ए. आर. जोशी)**

---

**म.सं.कौ.हि.का. अर्ज क्र. ४६/२०२४.** **नि. क्र. २४.**

**अनिता महेश प्रधान,**
वयः– ३१ वर्षे, धंदा– निरंक,
रा. तेलनखेडी, गोरेगांव जि. गोंदिया. ..... अर्जदार.

**विरुध्द**

[१] **महेश अनिल प्रधान,**
वयः– ३६ वर्षे, धंदा– शेती,

[२] **जयत्राबाई अनिल प्रधान,**
वयः– ५० वर्षे, धंदा– शेती,

[३] **भागनबाई शंकर प्रधान,**
वयः– ४५ वर्षे, धंदा– शेती,

[४] **ओमप्रकाश चंदन प्रधान,**
वयः– ५० वर्षे, धंदा– शेती,
सर्व रा. हलबीटोला, कोटरा,
ता. सालेकसा जि. गोंदिया ..... गैरअर्जदार.

---

**अर्जदारातर्फे श्री पी. पी. थेर विधिज्ञ.**
**गैरअर्जदार क्र. १ ते ४ तर्फे श्री एम. बी. यादव विधिज्ञ.**

---

**न्या य नि र्ण य**

(दिनांक ११ मार्च २०२६ रोजी घोषित)

अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५, कलम १२, १७, १८, १९,२०, आणि २२ अन्वये पोटगी, आदेश मिळण्यासाठी

दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे;</u>**

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक ०५.०४.२०१६ रोजी जातीरिवाजाप्रमाणे मौजा तेलनखेडी येथे संपन्न झाले. अर्जदार तिला प्राप्त झालेले सर्व भेत वस्तुसह लग्नानंतर गैरअर्जदाराच्या घरी नांदायला गेली व आपल्या वैवाहिक जिवनाची सुरुवात केली. तसेच वैवाहीक समागमातून तिला एक मुलगी नामे प्राची व एक मुलगा नामे हर्ष जन्मास आला.

३. अर्जदाराचे पुढे कथन असे की, सर्व गैरअर्जदार हे हुंडयाचे लोभी व्यक्ती आहेत. लग्नानंतर सर्व गैरअर्जदार तिला माहेरुन हुंडा आणण्याकरीता दबाव टाकत होते. तिचे आई–वडील गरीब असून, त्यांचे ऐपतीनुसार लग्नात अनेक भेट वस्तू दिले होते आणि आता ते गैरअर्जदारांचे सदर गैरकायदेशीर मागणी पूर्ण करण्यास असमर्थ होते, म्हणून अर्जदाराने सदर मागणीस नकार दिला. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने तिला अश्लील शब्दाने शिवीगाळ केले व निर्दयीपणे मारहाण केले.

४. अर्जदाराचे पुढे कथन असे की, गैरअर्जदार क्र १ हा दारुचा व्यसनी व्यक्ती आहे. तो नेहमी दारु पिवून घरी यायचा व त्यावेळी गैरअर्जदार क्र. २ ते ४ नेहमी अर्जदाराला मारहाण करण्याकरिता गैरअर्जदार क्र. १ ला उकसावत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ नेहमी दारु पीवून तिला अश्लील शब्दात शिवीगाळ करुन मारहाण करत होता. गैरअर्जदार क्र. १ तिला नेहमी म्हणायचे की, '' तु रांड आहेस तुझे लफडे आहेत, तु इथे राहु नको, मला मोटार सायकल घ्यायला रुपये दिली नाही, सोन्याची चैन दिली नाही हे सर्व आण नाही तर तुला मी जगु देणार नाही'' अशी धमकी देत होते.

५. अर्जदाराचे पुढे कथन असे की, गैरअर्जदार क्र. २ ते ४ अर्जदाराला नेहमी अशलील शब्दात शिवीगाळ करत होते व गैरअर्जदार क्र. १ ला भडकावीत होते. गैरअर्जदार क्र. १ तिला बरोबर जेवण सुद्धा देत नव्हता. त्यामुळे अनेक वेळा तिला उपाशी राहावे लागत होते. सर्व गैरअर्जदार नेमही तिला माहेरुन हुंडा आणण्याकरीता दबाव टाकत होते. त्याकरिता मानसीक व शारिरीक त्रास देत होते व घरघुती हिंसाचार करत होते.

६. अर्जदाराचे पुढे कथन असे की, सर्व गैरअर्जदारांचे क्रुर व्यवहार आणि घरघुती हिंसाचाराबद्दल अर्जदाराने तिचे पालकांना व नातेवाईकांना सांगितले होते. त्याकरिता समाजातील लोकांनी व तिच्या वडीलांनी गैरअर्जदारांना योग्य ती समज दिली होती. परंतु, गैरअर्जदार क्र. १ च्या व्यवहारात काही बदल झाले नाही आणि गैरअर्जदार क्र. १ नेहमी तिला व तिच्या परिवारांना जिवाने मारण्याची धमकी देत होता. तरीही अर्जदार गैरअर्जदार क्र. १ च्या घरी या आशेवर नांदत होती की सर्व गैरअर्जदार त्यांच्या व्यवहारात पुढे भविष्यात सुधारणा करतील परंतू, सर्व व्यर्थ ठरले.

७. अर्जदार पुढे असे कथन करते की, माहे मार्च–२०२४ मध्ये सर्व गैरअर्जदाराने तिला खूप मारहाण केली. त्यामुळे अर्जदार आपल्या मुलांना सोडून आपल्या वडीलांचा घरी गेली. अर्जदाराचे आई–वडील गरीब असून तिच्या पालन पोषण करण्यास ते सक्षम नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ कधीही तिला परत न्यायला आला नाही किंवा उदरनिर्वाह करीता कोणतेही साधन पुरविले नाही.

८. अर्जदार पुढे असे कथन करते की, तिच्याकडे कोणतेही काम नाही व तिला उत्पन्नाचे कोणतही साधन नसल्यामुळे ती स्वतःचे पालनपोषण व उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा मिस्त्री/गवंडीचे काम करतो व त्यातून दर महिना रुपये ४०,०००/– कमवितो. तसेच शेतजमीनीतून रुपये १,००,०००/– वार्षीक उत्पन्न घेतात. असा प्रकारे सध्याचे आवश्यक वस्तूचे बाजारभाव पाहता अर्जदाराला उदरनिर्वाहकरीता दरमाह रुपये २५,०००/–, मानहानी नुकसानी रक्कम ५०,०००/– आणि वैधकीय उपचार करिता खर्च २५,०००/– रुपये गैरअर्जदार हे सहजपणे देवू शकतात. म्हणून अर्जात मागीतलेल्या सर्व बाबी मंजूर करण्यात यावा अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

९. सर्व गैरअर्जदारांनी दिनांक १३.०६.२०२५ रोजी नि. क्र. १२ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले. त्यांनी अर्जातील प्रतिकूल कथनांचा नकार करुन कथन केले की, अर्जदाराने त्यांचे विरुद्ध खोटा व बनावटी केस न्यायालयात दाखल केले आहेत. गैरअर्जदारांनी तिचा कधीही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. लग्नानंतर अर्जदार ही त्याच्यासोबत घरी नांदायला आली परंतू तिचा वागणून गैरअजर्दार व त्यांच्या परीवारासोबत बरोबर नव्हता.

१०. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार ही घरघुती काम बरोबर करत नव्हती व विणाकारण लहाण–सहाण गोष्टीवरुन गैरअर्जदार क्र. १ आणि त्याची आई–वडिलांसोबत भांडण करुण शिव्या देत होती व त्यांचे अपमान करत होती. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ला तिच्या माहेरी येवुन राहण्यास म्हणत होती. परंतु गैरअर्जदार क्र. १ ची आई म्हातारी असल्यामुळे त्यांनी अर्जदारासोबत तिच्या माहेरी राहण्यास नकार दिले. म्हणून अर्जदाराने त्याच्यासोबत भांडण केले व खोट्या केसमध्ये फसविण्याची धमकी दिली.

११. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार ही गैरअर्जदाराला त्याची आईला पैशाची मदत व आवश्यक गरजांची पूर्ती करण्यास मनाई करत होती. अर्जदार वेळोवेळी त्यांना न विचारता माहेरी जावून राहत होती व ती स्वतः परत येत नव्हती. प्रत्येक वेळेस गैरअर्जदाराला तिला माहेरुन जावून आणावे लागत होते. अर्जदाराचे नवाटोला गावातील नामे रामेश्वर चमरु मरस्कोल्हे यांच्यासोबत अनैतिक संबंध होता. अर्जदार ही रामेश्वर सोबत पळून गेली होती. त्याबाबत तिच्या मामाने पोलिस स्टेशन येथे रिर्पोट दिली होती. तेव्हा पोलिसांनी गुम रजिस्टर क्र. ०९/२०२४ नोंद करुन तपास केला व दोघांना पकडले होते.

१२. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार हे गरीब असून काम मिळाल्यास १५०/– रुपये दर दिवस कमवितो. अन्यथा त्याला रिकामे राहावे लागते. याउलट, अर्जदार हे मजूरीचे व शेतीचे काम व इतर कामे करुन ४००/– रुपये दरदिवस कमविते. तिच्याकडे मौजा तिलंगखेडी ता. गोरेगांव जि. गोंदिया येथे ३ एकर दुहेरी फसल देणारी जलसिंचीत शेती आहे. त्यापासून ती दरवर्षी १,००,०००/– रुपये कमविते आणि स्वतःचा चांगल्याप्रमाणे पालनपोषन करु शकते. तसेच गैरअर्जदार क्र १ ला त्याचे स्वतःचे, दोन मुलांचे व त्याचे वयोवृद्ध आईचे पालनपोषण करावे लागते. अश्या परीस्थितीत गैरअर्जदार क्र १ तिला वेगळा पोटगी देण्यास सक्षम नाही. तसेच गैरअर्जदारांनी कधीच तिच्यावर घरघुती हिंसाचार केले नाही. अर्जदार स्वतः त्याला व मुलाला सोडून आपल्या माहेरी राहत आहे. म्हणून अर्जदारांना वेगळा पोटगी व भत्ता किंवा नुकसान भरपाई मागण्याच्या कोणताच अधिकारी नाही. असे कथन करुन, सदरजा अर्ज हा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१३. अर्जदाराचा पुरावा, युक्तीवाद व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे निष्कर्षासाठी निर्माण झाले. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिध्द करतात काय की, गैरअर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचार केला ? | अंशतः होकारार्थी |
| २. | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**अर्जदाराचा पुरावा**

१४. अर्जदाराने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. क्र. ०९ वर दाखल केले. अर्जदार हिचा सरतपास नि. क्र. ०९ च्या खाली घेण्यात आला. तिने तिच्या पुराव्यात, अर्जात कथन केल्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्नरावृत्ती केली. तसेच तिने कथन केले की, तिच्या सरतपासातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर तिची सही आहे.

१५. सदर साक्षीदाराचा गैरअर्जदारांतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला, अर्जदार यांनी गैरअर्जदारांतर्फे दाखल लेखी म्हणणेच्या प्रतिकूल कथनांचा नकार दिले व पुढे मान्य केले की, तिचे पती १० वी पर्यंत शिकले आहे. ती दोन वर्षापासून हलबीटोला गावी गेली नाही. मागील दोन वर्षात तिचे पती हलबीटोला गावामध्ये काय काम करते हे तिने स्वतः पाहिले नाही. तिच्या पतीने तिच्याविरुद्ध घटस्फोटाची केस दाखल केली नाही. तिचे पतीचे शेतीचे गट क्र. तिला माहित नाही. ती तिचे पतीचे शेतामध्ये परा लावण्याचे काम करण्यासाठी जात होती.

१६. सदर साक्षदाराने पुढे असे मान्य केले की, तिचे दोन मुले दोन वर्षापासून तिच्या पतीकडे राहत आहेत. तिच्या पतीसोबत त्याची आई राहते. ती तिचे पतीच्या घरी गेली होती परंतु त्यांनी तिला घरी येवु दिले नाही. तसेच सदर साक्षदाराने इतर प्रश्नांनाचे

नकारार्थी उत्तरे दिली.

**गैरअर्जदाराचा पुरावा –**

१७. गैरअर्जदार क्र. १ यांनी नि. क्र. १८ वर शपथपत्र दाखल करुन, स्वतःचा साक्षीपुरावा नोंदविला आहे. त्याच्या सरतपासातील मजकूर खरा व बरोबर आहे असे त्यांनी मान्य केले. गैरअर्जदार क्र. १ याने नि. क्र. १२ वर त्यांचे लेखी म्हणणेवर कथन केल्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्नरावृत्ती केली. गैरअर्जदार क्र. १ यांचा उलटतपास नि. क्र. १८ वर घेण्यात आला. त्यात त्याने नि. क्र. १७ खाली अनुक्रमांक ०१ वर गट क्र. २४६ चा सातबाराचा उतारा दाखल केला आहे. त्यास नि. क्र. २० देण्यात येते. अर्जदार बेपत्ताझाल्याबाबातचे तोंडी तक्राराची सत्यप्रत नि. क्र. २१ वर दाखल केली आहे. तसेच नि. क्र. १७ खाली अनुक्रमांक ०३ व ०४ वर असलेले दस्त यांना आर्टिकल अ व ब देण्यात आला.

१८. सदर साक्षीदाराचा अर्जदारातर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला, त्यात त्याने मान्य केले की, त्यांनी आजपर्यंत अर्जदाराविरुध कोणतीही तक्रार दिली नाही. तो मिस्त्रीचे काम करतो व त्यासाठी बाहेरगावी असतो. त्याची पत्नी व आई त्याच्या हिस्याची शेती करते. पुढे त्यांनी मान्य केले की, मिस्त्री/गवंडी कामगाराला ४००/– रुपये प्रतिदिवस मिळतो. त्यांची पत्नी तिच्या माहेरी राहते. पुढे त्यांनी असे मान्य केले की, तो दारुच्या व्यसनी आहे. तसेच अर्जदार त्याच्यासोबत नांदायला तयार आहे. त्यांनी पत्नीला परत नांदण्यासाठी कधीही पर्यत्न केले नाही. सदर साक्षदाराने अर्जदारानी अर्जात नमूद केलेल्या सर्व कथनांचा नकार दिली आहे.

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

१९. अभिलेखावर एकंदरीत पुराव्याच्या विचार करता असे दिसून येते की, अर्जदाराचे गैरअर्जदाराशी लग्न झालेला आहे व ती माहे मार्च–२०२४ पासून माहेरी राहत आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात आणि शपथपत्रात तिला गैरअर्जदार क्र. १ ते गैरअर्जदार क्र. ४ यांच्याकडून कौटुबिंक हिंसाचार होत असल्याचे सांगितले आहे. गैरअर्जदारांचे वकिलांनी अर्जदाराचे सविस्तर उलटतपास घेतले आहे. परंतु, अर्जदार तिच्या उलटतपासामध्ये सुद्धा तिच्यावर कौटुबिंक हिंसाचार झाल्यावर ठाम राहिली

आहे. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी कथनामध्ये व पुराव्यामध्ये त्यांनी अर्जदारावर कोणताही कौटुबिंक हिंसाचार केले नसल्याचे सांगितले आहे. परंतु, त्यांनी असे मान्य केले आहे की, तो दारुचा व्यसनी आहे. तसेच अर्जदार त्याच्यासोबत नांदायला तयार आहे. परंतु, तिला नांदवण्यासाठी त्यांनी कोणतेही पर्यत्न केले नाही. अर्जदार गैरअर्जदार क्र. १ ची वैवाहीक पत्नी असून ती गैरअर्जदार क्र. १ पासून वेगळी राहत आहे याबद्दल कोणतीही शंका नाही. याउलट, गैरअर्जदाराने कौटुबिंक हिंसाचार होत नसल्याबाबतचा कोणताही पुरावा दिला नाही. त्यामुळे अर्जदारावर गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी कौटुबिंक हिंसाचार केले आहे हे सिद्ध होते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर अशंतः होकार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

२०. अर्जदार ही माहे मार्च–२०२४ पासून माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने तिची कोणतेही निर्वाह भत्त्याची व्यवस्था केल्याबाबत दिसून येत नाही. अर्जदाराला दोन मुले आहेत व ते गैरअर्जदाराकडे राहतात. त्यामुळे अर्जदाराने तिच्या दोन मुलांच्या उदरनिर्वाहसाठी पोटगी मागितलेली नाही. याशिवाय अर्जदार हे कोणतेही काम करत नाही आणि तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे ती स्वतःचे पालन–पोषण करण्यास असमर्थ आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांनी आजपर्यंत अर्जदाराला उदरनिर्वाहसाठी कोणतीही मदत केली नाही. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ हा मिस्त्री/गवंडीचे काम करतो व त्यातून दरमाह ४०,०००/– रुपये कमवितो. तसेच गैरअर्जदाराकडे शेती असून त्यामधून तो दरवर्षी १,००,०००/– वार्षिक उत्पन्न घेतात.

२१. सदर प्रकरणात गैरअर्जदार यांनी त्याच्या उलटतपासात मान्य केला आहे की, तो मीस्त्री/गावंडीचे काम करतो. तसेच मीस्त्री/गावंडी कामगाराला प्रति दिवस ४००/– रुपये रोजी मिळतो. म्हणून गैरअर्जदार क्र. १ हा प्रती दिवस ४००/– रुपये कमवितो असे गृहीत धरता येते. गैरअर्जदार क्र. १ यांनी नि. क्र. १९ वर त्यांचे मालमत्तेबाबत शपथपत्र दाखल केले आहे. तसेच त्याच्यावर त्याचे स्वतःचे, दोन मुलांचे व त्याचे वयोवृद्ध आईची जबाबदारी आहे असे त्यांनी मान्य केले आहे. उपलबध पुराव्याचा अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार हा दारुच्या व्यसनी

व्यक्ती आहे. त्यामुळे त्याची आर्थीक क्षमता पाहता व अर्जदाराच्या उदरनिर्वाहसाठी, औषधोपचारासाठी, दैनदिन खर्चासाठी व इतर आवश्यक मूलभूत गरजांकरिता अर्जदार हिला १०००/– पोटगी प्रती महिना देणे योग्य होईल असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणून मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ ते गैरअर्जदार ४ यांनी अर्जदार हिला कोणताही कौटूंबिक हिंसाचार करु नये.

३. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये १०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त ) पोटगी म्हणुन हा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून द्यावेत.

४. गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्या विरुद्ध अ. क्र. ०२ व्यतिरिक्त कोणताही आदेश नाही.

५. सदर निर्वाह भत्ता प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत द्यावे.

६. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास या अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) द्यावेत.

७. या न्यायनिवाडयाची प्रत दोन्ही पक्षकारांना तसेच पोलीस निरीक्षक, तालुका सालेकसा पोलीस ठाणे यांना मोफत देण्यात यावी.

८. वर नमूद पोटगी व्यतरिक्त कोणताही इतर भत्ता मंजूर करण्यात आलेला नाही.

JOSHI ATUL RATNAKAR
Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.03.12 11:22:35 +0530

(ए. आर. जोशी)

दिनांकः– ११.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.